आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

९ जुलै २०२४ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी रशियाच्या ऑर्डर ऑफ सेंट अँड्र्यूज द ए-पॉस्टल या सर्वोच्च नागरी पुरस्कारानं सन्मानित
- आगामी काळात भारत- रशिया संबंध आणखी दृढ होतील असं मोदी यांचं रशियाच्या अध्यक्षाशी झालेल्या द्विपक्षीय चर्चेत प्रतिपादन
- महाराष्ट्र विधिमंडळात विनियोजन विधेयक मंजूर, ९४ हजार ८८९ कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या विक्रमी पुरवणी मागण्या सादर
- खलिस्तान समर्थक सिख फॉर जस्टिस या संघटनेवरची बंदी आणखी पाच वर्षे वाढवण्याचा केंद्र सरकारचा निर्णय

**आणि**

- आसाममध्ये पुरामुळे मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या ७२ वर

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना आज रशियातील सर्वोच्च समजल्या जाणाऱ्या ऑर्डर ऑफ सेंट अँड्र्यूज द ए-पॉस्टल या नागरी पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी हा सन्मान प्रधानमंत्री मोदी यांना प्रदान केला.

रशिया आणि भारत देशांतील विशेषाधिकार धोरणात्मक भागिदारी विकसीत करण्यासाठी आणि उभय देशांतील मैत्रीपूर्ण संबंधांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रधानमंत्री मोदी यांनी दिलेल्या योगदानासाठी हा सन्मान त्यांना देण्यात आला. रशियाचे पहिले प्रेषित सेंट अँड्र्यूज यांच्या सन्मानार्थ झार पीटर द ग्रेट यांनी हा पुरस्कार १६८९ पासून सुरू केला आहे.

**<><><><><>**

आगामी काळात भारत- रशिया संबंध आणखी दृढ होतील, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज व्यक्त केला. भारत - रशिया शिखर परिषदेप्रसंगी त्यांनी रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतीन यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली, त्यावेळी ते बोलत होते. गेली ४०-५० वर्ष भारत दहशतवादाचा सामना करत आहे, त्यामुळे मॉस्कोमधल्या दहशतवादी हल्ल्यावेळी झालेली वेदना आपण समजू शकतो, असं त्यांनी सांगितलं. कोणत्याही प्रकारचा दहशतवाद निंदनीय असल्याचं ते म्हणाले. रशियासोबतच्या सहकार्यामुळे भारतीय शेतकरी आणि भारतीय ग्राहकांचा मोठा फायदा झाला आहे, असं त्यांनी सांगितलं. भारत- रशिया यांच्यातल्या इंधन करारामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात स्थैर्य यायला मोठी मदत झाली, हे जगानं स्वीकारलं पाहिजे, असंही ते म्हणाले. यावेळी, युक्रेनमधला संघर्ष संपवण्यासाठी तोडगा काढण्याकरता मोदी केलेल्या प्रयत्नांबद्दल पुतीन यांनी त्यांचे आभार मानले.

त्याआधी या दोन नेत्यांनी मॉस्कोमधल्या प्रदर्शन केंद्राला भेट दिली. यावेळी त्यांना अणुऊर्जेसंबंधातलं चित्र प्रदर्शन दाखवण्यात आलं. मोदी त्यांनी क्रेमलिन इथल्या क्रांतिस्मारकाला भेट देऊन आदरांजली वाहिली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज मॉस्कोमध्ये भारतीय समुदायाशीही संवाद साधला. तिसऱ्या सत्ताकाळात तीन पट वेगानं काम करून भारतीय अर्थव्यवस्थेला जगात तिसऱ्या क्रमांकावर न्यायचं आहे, याचा पुनरुच्चार त्यांनी यावेळी बोलताना केला. आज आपला देश आत्मविश्वासानं उभा आहे, ही अतिशय महत्वपूर्ण बाब असल्याचं ते म्हणाले.

जगाला भारताकडून अनेक अपेक्षा आहेत आणि त्या पूर्ण करण्याची एकही संधी आपण सोडणार नाही, असं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

महाराष्ट्र विधिमंडळानं आज विनियोजन विधेयकाला मंजुरी दिली. विधानसभेत या विधेयकावर बोलताना, हे सरकार अस्तित्वात असताना दोन - दोन

वेळा अर्थसंकल्प सादर करण्याची गरज नव्हती, असं मत माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केलं. ही परंपरा होऊ नये याची काळजी घ्यावी असं ते म्हणाले.

त्यावर यापूर्वी २०१४, आणि २०१९ साली देखील असंच झालं होतं, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितलं. वास्तविक दोन वेळा अर्थसंकल्प सादर होणं योग्य नाही याच्याशी सहमत आहे. यासाठी एक समिती स्थापन करण्याची घोषणा केली होती, मात्र ती अद्याप अस्तित्वात आलेली नाही, ती लवकर स्थापन करुन हा प्रकार बंद व्हावा, असं अजित पवार म्हणाले.

**<><><><><>**

राज्याचा अर्थसंकल्प मंजूर झाल्यावर अवघ्या काही मिनिटात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एकंदर ९४ हजार ८८९ कोटीपेक्षा जास्त रकमेच्या विक्रमी पुरवणी मागण्या विधानसभेत सादर केल्या. यामध्ये, याच अतिरिक्त अर्थसंकल्पात मांडलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी २५ हजार कोटी रुपयांची मागणी केली आहे. सर्वाधिक, २६ हजार २७३ कोटी रुपयांपेक्षा जास्तीच्या मागण्या महिला आणि बालहक्क विकास विभागाच्या, तर त्याखालोखाल, १४ हजार ५९५ कोटीपेक्षा जास्त रकमेच्या मागण्या नगर विकास विभागाच्या आहेत.

विधानसभा निवडणुकीत निवडून येण्यासाठी आणि जनतेची फसवणूक करण्यासाठी एवढ्या मोठ्या प्रमाणात पुरवणी मागण्या सरकारनं मांडल्या आहेत, अशी टीका माजी अर्थमंत्री जयंत पाटील यांनी केली. यामुळं राज्याचं रेटींग कमी होऊन कर्जावर अधिक व्याज द्यावं लागेल, असं सांगत त्यांनी. या मागण्यांना विरोध केला. त्यावर, राज्याची आर्थिक शिस्त बिघडू नये याची खबरदारी घेऊनचं या पुरवणी मागण्या सादर केल्या असल्याचं अर्थमंत्री अजित पवार यांनी सांगितलं.

**<><><><><>**

विधानपरिषदेत अर्थसंकल्पावर झालेल्या चर्चेला मंत्री दीपक केसरकर यांनी उत्तर दिलं. या अतिरिक्त अर्थसंकल्पात प्रत्येक विभागासाठी भरीव आणि पुरेशी

तरतूद केली आहे, त्यामुळे अर्थसंकल्पातल्या योजना राबवण्यासाठी निधीची कमतरता भासणार नाही, असं त्यांनी सांगितलं.

विधानपरिषदेत पुरवणी मागण्या केसरकर यांनी मांडल्या.

**<><><><><>**

मुंबईतल्या रेल्वेमार्गांवरच्या विविध स्थानकांची नावं बदलण्याची शिफारस केंद्र सरकारकडे करण्याचा प्रस्ताव विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी आज एकमतानं मंजूर केला. मध्य रेल्वेमार्गावरच्या करी रोड स्थानकाचं नाव लालबाग स्थानक, मध्य आणि हार्बर रेल्वे मार्गांवरच्या सॅन्डहर्स्ट रोड स्थानकाचं नाव डोंगरी स्थानक, पश्चिम रेल्वेमार्गावरच्या मरीन लाइन्स स्थानकाचं नाव बदलून मुंबादेवी स्थानक, तर चर्नी रोड स्थानकाचं नाव गिरगाव स्थानक करण्याची शिफारस या प्रस्तावात केली आहे.

तसंच हार्बर रेल्वे मार्गावरच्या कॉटन ग्रीन स्थानकाचं नाव काळा चौकी स्थानक, डॉकयार्ड स्थानकाचं नाव माझगाव स्थानक, तर किंग्ज सर्कल स्थानकाचं नाव बदलून तीर्थंकर पार्श्वनाथ रेल्वे स्थानक करण्याची शिफारसही या प्रस्तावात आहे.

**<><><><><>**

खलिस्तान समर्थक असलेल्या सिख फॉर जस्टिस या संघटनेवरील बंदी आणखी पाच वर्षांसाठी वाढवण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. बेकायदा कारवाई प्रतिबंध कलमाअंतर्गत हा निर्णय घेतला आहे.संघटनेच्या कारवायांमुळे देशाच्या अखंडतेला आणि सुरक्षिततेला धोका असल्याचं सरकारनं म्हटलं आहे. राष्ट्रीय तपास यंत्रणेनं या संघटनेविरोधात अनेक गुन्हे दाखल केले आहेत.

सिख फॉर जस्टिस अमेरिकेमधील संघटना असून गुरपतवंत सिंह पन्नून हा त्याचा प्रमुख आहे. पन्नून याला भारतानं दहशतवादी म्हणून जाहीर केलं आहे.

**<><><><><>**

आसाममध्ये पुरामुळे मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या ७२ वर गेली आहे. राज्यात २७ जिल्ह्यांमधल्या २२ लाख नागरिकांना अजूनही पुराचा धोका आहे. पुरामुळे ४९ हजार हेक्टर क्षेत्रातल्या पिकांचं नुकसान झालं आहे. १२७ रस्ते आणि २ पुलांचंही नुकसान झालं आहे. एनडीआरएफ आणि एसडीआरएफच्या जवानांनी काल २१८ जणांची सुटका केली. ब्रह्मपुत्रा, आणि बराक, तसंच त्यांच्या उपनद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे.

राज्य सरकारनं २४५ मदत शिबिरं आणि २९८ मदत वाटप केंद्र स्थापन केली आहेत. सध्या ५३ हजारांपेक्षा जास्त नागरिक मदत शिबिरांमध्ये आहेत. आसामच्या पूरग्रस्त भागातील नागारिकांच्या पुनर्वसनासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी लवकरच विशेष निधी जाहीर करतील, अशी माहिती केंद्रीय ऊर्जा,गृहनिर्माण आणि शहरमंत्री मनोहर लाल यांनी आज  गुवाहाटी इथं दिली. पूरग्रस्त भागाची हवाई पहाणी केल्यानंतर ते बातमीदारांशी बोलत होते.

**उत्तर प्रदेश**मध्ये सहा जिल्ह्यांतल्या दोनशे गावांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. श्रावस्ती इथल्या ४४ हजार, तर लखिमपूर खिरीमधल्या ३० हजार नागरिकांना पुराचा फटका बसला आहे. **राजस्थान आणि उत्तराखंड** मध्येही अनेक ठिकाणी पुरामुळे जनजीवन विस्कळित झालं आहे.  उत्तराखंडचे  मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी आज पूरग्रस्त कुमाऊ भागाची हवाई पहाणी केली.

**<><><><><>**

उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे उपाध्यक्ष जगदीप धनखड येत्या ११ तारखेला महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांना संबोधित करणार आहेत. विधानसभेचे सभापती राहुल नार्वेकर आणि विधानपरिषदेच्या उपाध्यक्ष डॉक्टर नीलम गोऱ्हे यांचं यासंदर्भातलं निमंत्रण उपराष्ट्रपतींनी स्वीकारलं आहे. देशाची लोकशाही मूल्यं आणि नीतिमत्ता वाढवण्याबाबत ते सदस्यांना मार्गदर्शन करतील.

**<><><><><>**

राज्यातील आरक्षणाच्या प्रश्नासंदर्भात आज मुंबईत सर्वपक्षीय नेत्यांची बैठक मुख्यमंत्र्यांनी बोलावली आहे. मात्र या प्रकरणी राज्य सरकारनं विरोधकांना विश्वासात न घेतल्यानं महाविकास आघाडी बैठकीला जाणार नाही. आरक्षणप्रश्नी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी यांनी आंदोलनाला भेट देऊन काय चर्चा केली आहे हे राज्यातील जनतेला कळलं पाहिजे. राज्य शासनानं आरक्षणप्रश्नी त्यांची भूमिका सभागृहात स्पष्ट करावी, अशी मागणी विधानसभेत, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमध्ये, आज भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातला तिसरा आणि अखेरचा टी-२० सामना चेन्नईच्या चिदंबरम मैदानावर सुरू आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा दक्षिण आफ्रिकेच्या १५ व्या षटकात ७ बाद ७५ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**